## प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शरयु एग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड, पोस्ट-कापशी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत मोलॅसिस आसवणी प्रकल्पाची क्षमता ६०.० किलोलिटर/दिन पासून १२०.० किलोलिटर/दिन पर्यंत विस्तारिकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शरयु एग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड, पोस्ट-कापशी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत मोलॅसिस आसवणी प्रकल्पाची क्षमता ६०.० किलोलिटर/दिन पासून १२०.० किलोलिटर/दिन पर्यंत विस्तारिकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२० रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ५१/२०२० द्वारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी -२०१००१-एफटीएस-००३५, दिनांक ०१-१०-२०२० अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, सातारा - समन्वयक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री भड यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स शरयु एग्रो इंडस्ट्रीज लिमिटेड, पोस्ट-कापशी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत मोलॅसिस आसवणी प्रकल्पाची क्षमता ६०.० किलोलिटर/दिन पासून १२०.० किलोलिटर/दिन पर्यंत विस्तारिकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक



Scanned with CamScanner

विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ३०-०९-२०१९ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १८-१०-२०१९ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सातारा यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०५ सप्टेंबर, २०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सातारा, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सातारा , तहसील कार्यालय-फलटण, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत कार्यालय-कापशी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सातारा यांना इमेलव्दारे एक सूचना /तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

समन्वयक श्री भड यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.



Scanned with CamScanner

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित आसवणी प्रकल्पात ४६.५५ कोटी रुपयांची गुंतवणूक असून सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) आहे. त्यांनी विविध प्रदूषण नियंत्रण यंत्रणेविषयी माहिती दिली.

सादरीकरणानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतलाः-

१) श्री विलास आत्माराम गायकवाड, राहणार - कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

आसवणी प्रकल्पासाठी किती लिटर्स पाणी उत्पादनासाठी लागेल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आपल्या आसवणी प्रकल्पात १०.० लीटर पाणी लागेल. एक लिटर अल्कोहोलसाठी १०.० लीटर पाण्याची परवानगी आहे. मात्र आपणास २ ते २.३ लीटर्स पाणी लागते. आता उरलेल्या पाण्याची गरज ही उत्पादनात प्रक्रियेनंतर पाण्याचा पुनर्वापर करुन भागवली जाते.

२) श्री संदीप काशीद, राहणार - कापशी - बीबी, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

आसवणी प्रकल्पामुळे काही नविन रोजगार निर्मिती होईल का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की निश्चितच बीबीकरांनी चांगला प्रश्न विचारलेला आहे. याआगोदरही कार्यरत आसवणी प्रकल्पात कारखाना व्यवस्थापनाने स्थानिकांनाच प्राधान्य दिलेले आहे. त्याचप्रमाणे ह्या विस्तारित आसवणी प्रकल्पातही रोजगाराची निर्मिती झाल्यास स्थानिकांनाच सामाऊन घेतले जाईल असे व्यवस्थापनतर्फे आश्वासन देण्यात आले. उपस्थितांनी टाळ्या वाजून त्यांचे स्वागत केले.

३) श्री सत्यवान बाबूराव बोरडे, राहणार-कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

आसवणी प्रकल्पातून कोणकोणत्या प्रकारचे सांडपाणी निर्मिती होणार व त्याचे प्रमाण किती असेल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की मुख्य सांडपाणी स्पेंट वॉश नावाचे आहे. एका लिटरला आठ लिटर एवढा तो तयार होतो. मात्र तो आटवणार व शेवटी घट्ट होतो, तो १-१.१/२ लिटर एवढा होईल. म्हणजे आठ लिटरपासून दोन लिटर्स पर्यंत आणला जाईल व शेवटी तो जाळला जाईल. बाकीचे विविध विभागातून उत्पादनात उत्पन्न होणारे सांडपाणी कन्डेनसेट पॉलिशींग युनिट (सीपीयु) मध्ये प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येईल. म्हणजे स्पेंट वॉश हा पुर्णपणे जाळला जाईल व सर्व सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे ७८-८०% शुध्द पाण्याची बचत होते.

४) श्री सुशांत अशोक राशिनकर, राहणार-कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

मोलॅसिसवर आधारित आसवणी प्रकल्पात सांडपाण्यावर कोणत्या प्रकारची प्रक्रिया करण्यात येईल.



Scanned with CamScanner

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की इतर आसवणी प्रकल्पात कंपोस्टींग केले जाते, त्यामुळे ते आसवणी प्रकल्प हा फक्त २४० दिवसच चालवता येतो. पावसाळ्यात आसवणी प्रकल्प बंद ठेवावा लागतो. या प्रकल्पात स्पेंट वॉश हा पूर्णपणे इन्सरेशमध्ये जाळण्यात येणार आहे. काही ठिकाणी स्पेंट वॉशची पावडर करण्यात येते. म्हणजे त्यातील पाणी काढून ती पावडर ऑरगॅनिक खत म्हणून वापरता येते. आम्ही जेव्हा आसवणी प्रकल्प सुरु केला, तेव्हा पावडर करण्याचे तंत्रज्ञान नव्हते, इन्सिनरेशन चांगले चालू असते, म्हणून इन्सिनरेशन तंत्रज्ञान घेण्यात आले. येथे स्पेंट वॉशचे ज्वलन करण्यात येणार येऊन तो नष्ट करणार आहेत.

५) श्री किरण बांदल, राहणार-सासवड

प्रक्रिया केलेले सांडपाणी परत वापरता येईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येईल. जर आपण शेतकरी असाल, तर तसं तुम्हांला देता येत नाही. साखर कारखान्यातील प्रक्रिया केलेले सांडपाणी मागणी केल्यास शेतीला देतात. मात्र येथे प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येईल.

६) श्री दशरथ हरिभाऊ शिंदे, राहणार-तरड गाव, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

आपल्या आसवणी प्रकल्पात कोणकोणते उत्पादने घेतली जातात याची सविस्तर माहिती द्यावी. प्रकल्पात मुख्य अल्कोहोल ज्यास आपण इथाईल अल्कोहोल म्हणतो त्याचे उत्पादन होते. त्यास रेक्टिफाईड स्पिरिट असे म्हणले जाते. ६०,००० लिटर प्रतिदिन उत्पादन घेतले जाते. आता विस्तारिकरणानंतर १,२०,००० लिटर प्रतिदिन उत्पादन घेतले जाईल. त्यास अल्कोहोल म्हटले जाते. रेक्टीफाईट स्पिरिट हे पहिले उत्पादन असते. नंतर ईएनए, इथेनॉल असे घेतले जातात. बाजारातील मागणीनुसार तयार करण्यात येईल. आता सॅनिटाझर वापरतात त्यात सुध्दा इथेनॉलचा वापर केला जातो. एक्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल तयार करण्यात येईल.

७) श्री रविंद्र महादेव कदम, राहणार-कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

मोलॅसिसवर हा जो आसवणी प्रकल्प आहे, त्यात घनकचरा उत्पन्न होऊ शकतो का व त्याची विल्हेवाट कशी लावणार?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात दोन प्रकारच्या कच-याची निर्मिती होते. घन कचरा (solid waste) व घातक कचरा (Hazardous Waste). घन कचरा (solid waste) यास यीस्ट सल्ज म्हणतात. त्यातील पाणी काढून तो जाळला जातो. आसवणी प्रकल्पात कुठलेही घातक कचरा होत नाही. जो होतो, तो बॉयलरमध्ये जाळला जाणार.

८) श्री हेमंत शिवाजी खताळ, राहणार-कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - साताराः-

आसवणी प्रकल्पातून दररोज किती अल्कोहोल तयार होईल.

१,२०,००० लिटर्स प्रतिदिन अल्कोहोल तयार होईल अशी माहिती प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी दिली.



Scanned with CamScanner

९) श्री विलास आबासाहेब काळे, राहणार-कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा:-

मोलॅसिसवर आधारित आसवणी प्रकल्पातून किती स्पेंट वॉश तयार होईल?

१२० X ८ = ९,६०,००० लिटर्स प्रती दिन स्पेंट वॉश तयार होतो. तो ८०-९०% आटवला जातो अशी माहिती पर्यावरण सल्लागार यांनी दिली.

१०) श्री भानुदास तुकाराम जाधव, राहणार-कापशी गाव, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा:-

हा प्रकल्प किती दिवस चालेल.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की हा प्रकल्प ३३० दिवस चालेल. देखभालीसाठी काही दिवस सोडले तर पावसाळ्याचे चारही महिने पकडून एक वर्ष चालतो. कारण बंधिस्त स्वरुपात आहे. कंपोस्टींग करावे लागत नाही. इन्सिनरेशन बॉयलरसुध्दा झाकलेल्या अवस्थेतच असतो.

११) श्री दत्तात्रय अप्पाजी धायगुडे,डोंबाळवाडी,
तालुका-फलटण, जिल्हा - सातारा:-

स्पेंट वॉश म्हणजे काय?

स्पेंट वॉश हा इंग्रजी शब्द आहे. स्पेंट म्हणजे टाकाऊ. स्पेंट वॉश म्हणजे फरमेन्टेशन डिस्टिलेशनमधून जो निघतो.त्यातून अल्कोहोल काढून घेतले की तो उरतो. जर १०० लिटर्स अल्कोहोल असेल, तर त्यात १२ लिटर्स अल्कोहोल व ८८ लिटर्स स्पेंट वॉश असतो. त्यास सांडपाणी म्हणतात. ( म्हणजे १२% अल्कोहोल व ८८% स्पेंट वॉश/सांडपाणी ).

१२) श्री संजय काळे, राहणार-कापशी गाव,
तालुका - फलटण, जिल्हा - सातारा:-

सदरहू प्रकल्पात कोणकोणती प्रदूषण नियंत्रण उपकरणे/सयंत्रणा कार्यान्वित करणार आहेत?

बॉयलर, एमईई (मल्टी इफेक्टीव्ह इवॅपोरेटर), सीपीयु (सेन्ट्रल प्रोसेसिंग युनिट) ही उपकरणे/सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे हवा प्रदूषण नियंत्रणासाठी चिमणी (stack) व इएसपी उपकरणे कार्यान्वित करण्यात येतील. जसे प्रदूषण म्हणजे जल, हवा, त्या त्या प्रमाणे प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येतील. यात मुख्य म्हणचे बॉयलर व इएसपी आहे.

डॉ. जे. बी. संगेवार, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारले की प्रकल्पात स्पेंट वॉश इन्सिनरेशन म्हणजे जाळणार आहात काय? त्याचे इमिशन्स (Emissions) तपासले आहेत काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की यात वाजवीपेक्षा जास्त प्रदूषके नाहीत. ते ऑनलाईन सयंत्रणेस जोडलेले आहे. सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी यावर त्याचे पृथ्थकरण केले का अशी विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी देखरेखवेळी (Monitoring) करण्यात येते. पर्यावरण सल्लागार यांनी qualitative



Scanned with CamScanner

(गुणात्मक) का quantitative (परिमाणात्मक) हवे काय असे विचारले असता दोन्ही हवेत असे सांगितले. सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की स्पेंटवॉशमध्ये सल्फरचे प्रमाण जास्त असते तर सल्फर इमिशन्सची माहिती उपलब्ध करुन देण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी ती देण्याचे कबूल केले. त्याचप्रमाणे त्यातील इतर प्रदूषकांची माहिती अभ्यास करुन द्यावी अशी सूचना केली.

श्री भड, उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, सातारा तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना माहिती दिली की या प्रकल्पाविषयी श्री महेश दिलीप वरपे, मुक्काम पोस्ट कापशी यांच्याकडून एक ऑनलाईन तक्रार/निवेदन प्राप्त झालेले आहे. समन्ववयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी तक्रार/निवेदन बैठकीत वाचून दाखविले. तक्रारदाराने लिहिलेले आहे की शरयु अग्रो इंडस्ट्रीज् लिमिटेड या प्रकल्पामुळे गावातील व आजूबाजूच्या गावातील विहिरी व बोअरवेल्सचे पाणी प्रदूषित झालेले आहे. खराब झालेल्या पाण्यामुळे मानवी जीवनावर तसेच पशु प्राण्यांवर वाईट दुष्परिणाम झालेला आहे. यामुळे आम्हांला पिण्याच्या पाण्यास पर्याय उरलेला नाही. तसेच डिस्टलरी बॉयलरमुळे राख व परिसरात काजळीचे प्रमाण अत्यंत प्रमाणात आहे. याच्यामुळे घरात खूप काजळी पडत आहे. तसेच दोन्ही खुप मोठ्या प्रमाणात परिसरामध्ये होत आहे. यामुळे परिसरातील लोकांना श्वसनाचे त्रास जाणवत आहेत. तरी मा. साहेबांनी परिसरातील जनजीवनाचा विचार करुन पाण्याच्या तसेच हवेच्या होणारे प्रदूषण रोखण्याकरिता ठोस निर्णय घेऊन कारवाई करावी, तसेच नविन वाढीव परवानगी देण्यात येऊ नये, ही नम्र विनंती.

सदरहू तक्रार बैठकीत वाचून दाखविण्यात आली.

पर्यावरण सल्लागार यांनी तक्रारदाराचे गावाचे नांव विचारुन कापशी गावातील बरेच लोक बोलले असून पर्यावरण मुल्यांकन अहवाल तयार करताना प्रकल्पाच्या आजूबाजूच्या विहिरींचे, बोअरवेलचे पाण्याचे नमुने गोळा केले. त्यांचा अहवाल पाहीला असता परिसरातील विहिरींच्या व बोअरवेलच्या पाण्यात बीओडी व सीओडीचे प्रमाण जास्त आढळते. मात्र ते नगण्य आहे. ते कारखान्याच्या माध्यमातून झाले या निष्कर्षापर्यंत येता येत नाही. कारखाना कंपोस्टींग करत असता तर एकवेळ ते ठरवता आले असते. तसेच राखेबाबत जेव्हा देखभाल (मॉनिटरिंग) करण्यात आले, तीन महिने आम्ही मॉनिटरींग केलेले आहे. त्यावेळी असे काहीही आढळले नाही. पर्यावरण सल्लागार यांनी उपस्थितांना आपल्याला काही असे आढळत असल्यास ते येथे उपस्थित करावे असे सांगितले. त्यांनी तक्रारीची एक प्रत मागवून घेतली व त्यास अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात उत्तर देण्याचे मान्य केले.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना कोणाचे आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नव्हता.



Scanned with CamScanner

माननीय अध्यक्षांनी समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांचा इतिवृतात समावेश करण्या येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व उपस्थांचे आभार मानले व मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी बैठक संपल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

(एल.एस.भड)
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर
लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, सातारा,

20/10
(डॉ. जे. बी. संगेवार),
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे

(सुनील थोरवे),
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा-सातारा

Scanned with CamScanner